



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १४९ * नांदेड * गुरूवार, दि. ५ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## आरसीबीच्या विजयाला गालबोट, चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** आयपीएल विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या जल्लोषाला गालबोट लागलं आहे. विजेत्या संघाची व्हिक्टरी परेड पाहण्यासाठी झालेल्या तुफान गर्दीमुळे चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेटवर मोठी चेंगराचेंगरी झाली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. इतकंच नाही तर या चेंगराचेंगरीत दहा पेक्षा जास्त चाहते जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.

रजत पाटीदार आणि विराट कोहलीच्या आरसीबीने फायनलमध्ये श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्जचा पराभव करुन आयपीएल २०२५ च्या चषकावर नाव कोरलं. तब्बल १८ वर्षांनी आरसीबीने मिळवलेल्या विजयामुळे कर्नाटकसह विराटच्या चाहत्यांचा उत्साह प्रचंड आहे. त्यामुळेच आज बंगळुरुत अनेक चाहते चिन्नास्वामी स्टेडियमवर क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी जमा झाले आहेत.

आरसीबीच्या आयपीएल विजेतेपदाचा जल्लोष साजरा करण्यासाठी बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर, ११ हून अधिक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

आरसीबीनं आयपीएलच्या १८ व्या हंगामाचं विजेतेपद पंजाब किंग्जला गुजरातच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये ६ धावांनी पराभूत करत जिंकलं यानंतर बंगळुरुत काल रात्रीपासून विजयाचा जल्लोष करण्यात येत आहे. बुधवारी सायंकाळी ५ ते ६ वाजताच्या दरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर विजयी जल्लोष साजरा करण्यात येणार होता. मात्र, आरसीबीच्या चाहत्यांची मोठी गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाल्याची माहिती आहे. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला असून ही संख्या देखील वाढू शकते. याशिवाय १० ते १५ जण जखमी झाल्याची माहिती आहे.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी करणारा आणखी एक युट्यूबर अटकेत

**अमृतसर (प्रतिनिधी)–** पाकिस्तानासाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली ज्योती मल्होत्रा नंतर आता आणखी एका युट्यूबरला अटक केली आहे. पंजाब पोलिसांच्या स्टेट स्पेशल ऑपरेशन सेलने बुधवारी एका पाकिस्तानी हेरगिरी नेटवर्कचा पर्दाफाश करत जसबीर सिंग या युट्यूबरला अटक केली आहे. जसबीर सिंगला पाकिस्तान समर्थित हेरगिरी नेटवर्कमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'जान महल' नावाचे युट्यूब चॅनल चालवणारा जसबीर सिंग याचा दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या हेरगिरी नेटवर्कचा भाग असलेल्या पीआयओ शाकीर उर्फ जुट रंधावा याच्याशी संबंध असल्याचे आढळून आले आहे.

## छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी चौकशीसाठी नांदेडच्या दोन सराफांना घेतले ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती संभाजीनगरमधील वाळुज येथे झालेल्या दरोडा प्रकरणातील सोने नांदेडला विकल्याच्या संशयावरून छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी इतवारा पोलिसांच्या मदतीसह सराफा भागातून दोन जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज येथे दरोडा झाला होता. त्यामध्ये ५ किलो सोने आणि २० किलो चांदी चोरीला गेली होती. या दरोडेखोरांचा तपास करताना छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी एका आरोपीवर गोळीबार



करून स्वतःच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी त्याचा खात्मा केला होता. सध्या पाच आरोपी छत्रपती संभाजीनगर पोलीसांच्या ताब्यात आहेत. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत पाठविले आहे.

आपल्या गुन्ह्याचा शोध करतांना छत्रपती संभाजीनगर पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार २०० ग्रॅम सोने नांदेडला विकले आहे. याचा माग काढत छत्रपती संभाजीनगर पोलीस नांदेडला आले. दरोडेखोरांनी दिलेल्या माहितीनुसार ज्याला त्यांनी सोने दिले होते, त्याला इतवारा पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. नांदेडच्या त्या सराफाने ते दरोड्यातील सोने वितळवून त्याचे बिस्कीट तयार करून नांदेडच्या सोनाराला विकल्याची माहिती दिली. इतवारा पोलिसांच्या मदतीने छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी सोनार आणि सोनाराला सोने विकणारा अशा दोघांना ताब्यात घेतले आहे. सध्या या दोघांची चौकशी इतवारा पोलीस ठाण्यात सुरू आहे.




**नांदेड** : महेश नवमीनिमित्त नांदेड जिल्हा माहेश्वरी समाजाच्यावतीने शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी विविध देखावे, प्रात्यक्षिक सादर करण्यात येत होते. (छाया : करणसिंह बैस)

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे हे दि. ६ जून रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

शुक्रवार, दि. ६ जून २०२५ रोजी वाशिम येथून मोटारीने दुपारी ३ वा. नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायंकाळी ५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व राखीव. सायं. ६.१० वा. नांदेड विमानतळ येथून पुणेकडे प्रयाण करतील.

## एकाच दिवसात विनातिकीट ४३८ प्रवाशांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** रेल्वे गाडीतून विनातिकीट प्रवास करणाऱ्या ४३८ प्रवाशांवर कारवाई करण्यात आली आहे.

रेल्वेस्थानकात आणि रेल्वे गाड्यांमध्ये अनधिकृत प्रवेश आणि अनधिकृत रेल्वे प्रवासाला आळा घालण्याच्या उद्देशाने रेल्वे विभाग नियमितपणे तिकीट तपासणी मोहीम हाती घेत असते. विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांच्या सुचनेनुसार आणि डॉ. विजय कृष्णा/वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनानुसार, दि. २ जून रोजी परभणी-नांदेड-मुदखेड-आदिलाबाद विभागात एक विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम एन. सुब्बा राव/ सहायक वाणिज्य व्यवस्थापक यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली.

यादरम्यान दि. २ जून रोजी १६ रेल्वे गाड्यांची



कसून तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान, अनधिकृत विक्रेते, तिकिटे नसलेले प्रवासी तसेच सीझन तिकीट किंवा जनरल तिकिटांसह आरक्षित डब्यांमध्ये प्रवास करणाऱ्यांक तब्बल ४३८ प्रवाशांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. यात त्यांच्याकडून ३ लाख १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

## देशात १ मार्चपासून जनगणना सुरू होणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशात १ मार्चपासून जातनिहाय जनगणनेला सुरूवात होणार आहे.

देशात जातनिहाय जनगणनेच्या मागणीला आता केंद्रातील मोदी सरकारने हिरवा कंदील दर्शवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत, ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची माहिती दिली होती. मात्र, जनगणना कधी होणार हे निश्चित नव्हते. त्यामुळे, जनगणना होणार कधी हा प्रश्न कायम होता. आता, जनगणना करण्याची तारीख समोर आली असून देशात १ मार्च २०२७ पासून जनगणनेला सुरुवात होणार आहे.

## २१ जुलै ते १२ ऑगस्टदरम्यान संसदेचे पावसाळी अधिवेशन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवार २१ जुलै ते मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत होणार आहे. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. अधिवेशनाच्या काळात संसदेच्या दोन्ही सभागृहात देशातील विविध विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनातील कामकाजाची सुरुवात सोमवार २१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज समितीने पावसाळी अधिवेशनाच्या तारखा निश्चित केल्या आहेत.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली होती. पर्यटकांना ठार करण्यात आले होते. या घटनेनंतर काही दिवसांनी भारताने ऑपरेशन सिंदूर केले आणि पाकिस्तानला दणका दिला होता. ऑपरेशन सिंदूर नंतर भारताने निवडक देशांमध्ये राजकीय शिष्टमंडळे पाठवून देशाची दहशतवाद विरोधी भूमिका जाहीररित्या मांडली होती. शिष्टमंडळांमध्ये सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांतील अनेक नेते सहभागी करुन घेतले होते.









जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भारतासाठी दुहेरी आव्हान

भारताने नुकतीच ऑपरेशन सिंदूरची कारवाई यशस्वीपणे पार पाडली. या विजयाने देशभर आनंदाचे वातावरण आहे. ऑपरेशन सिंदूरची यशोगाथा आपण नक्कीच साजरी करू शकतो. परंतु या यशामुळे आपण अंधविश्वासाच्या गुहेत जाता कामा नये. चीन आणि पाकिस्तान यांच्या एकत्रित प्रयत्नांनी भारतासाठी निर्माण होणारे संकट हे केवळ लष्करीच नाही, तर रणनीतिक, तांत्रिक व राजनैतिक आव्हान आहे. या दोन देशांपासून निर्माण होणाऱ्या दुहेरी धोक्याच्या विरोधात भारताने केवळ कठोरता नव्हे, तर बुद्धिमत्तेने आणि दूरदृष्टीने उभे राहावे लागेल. पाकिस्तानला धडा शिकविण्यात भारताला यश आले असल्याचे सरकारचे मत आहे. मात्र, अमेरिकेच्या संरक्षण गुप्तचर विभागाच्या अलीकडील अहवालामुळे या आनंदावर सावट पडले आहे. या अहवालाने स्पष्ट केले आहे की, पाकिस्तान भारताला अस्तित्त्वासाठी धोका मानतो आणि म्हणूनच पारंपरिक लष्करी ताकद कमी पडू नये म्हणून अण्वस्त्रांचा विकास व लष्करी आधुनिकीकरण सुरू ठेवणार आहे. या सगळ्या प्रकारात सर्वात चिंतेची बाब म्हणजे चीनच्या सक्रिय पाठिंब्यामुळे पाकिस्तानची ही आक्रमक भूमिका अधिकच धारधार बनते आहे. या अहवालानुसार चीनने पाकिस्तानला अत्याधुनिक युद्धसामग्री व अण्वस्त्रसंबंधी मदत पुरवली आहे. अमेरिकेच्या विश्लेषणानुसार, भारतासाठी असलेला प्रमुख धोका म्हणजे चीन, आणि पाकिस्तान हे त्याचे अण्वस्त्रधारी हस्तक. पाकिस्तान एकट्यानेच भारताला आव्हान देत नाही, तर चीनच्या साथीने दोन आघाड्यांवर लढा उभा करत आहे. हे केवळ लष्करी संकट नाही, तर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने दीर्घकालीन आव्हान आहे. गुप्तचर अहवालात धक्कादायक अधोरेखित झाल्या आहेत. जसे पाकिस्तानने भारताविरुद्ध केलेल्या अलिकडच्या चार दिवसांच्या कारवाईत चीनने उपग्रहाच्या सहाय्याने त्याला माहिती दिली. या कारवाईत पाकिस्तानने चीनकडून मिळालेले जेएफ-१७ व जे-१० सी लढाऊ विमानं, तसेच पीएल-१५ क्षेपणास्त्र वापरले. पाकिस्तान अजूनही विदेशी पुरवठादारांमार्फत अण्वस्त्र उत्पादनास उपयुक्त साधने मिळवतो आहे. पाकिस्तानची रणनिती स्पष्ट आहे की, भारताला जर अण्वस्त्रांची भीती वाटत नसेल, तरीही पाश्चिमात्य देशांना हे भीतीदायक वाटेल, आणि त्यातून तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप घडवून आणता येईल. चीनचा भारतविषयक दृष्टिकोन केवळ व्यापारी स्पर्धेपुरता मर्यादित नाही. गेल्या काही वर्षांपासून सीमावाद, अरुणाचल प्रदेशमधील घुसखोरी, आणि लडाखमधील तणाव या घटना व गोष्टीला दुजोरा देतात की, चीन भारताविरुद्ध दीर्घकालीन रणनिती राबवत आहे. पाकिस्तानसारखा देश या रणनितीत चीनसाठी एक अण्वस्त्रधारी प्याद्याप्रमाणे काम करत आहे. हे एक अत्यंत धोकादायक समीकरण आहे. भारताची पारंपरिक लष्करी ताकद पाकिस्तानपेक्षा नक्कीच अधिक आहे. परंतु या अहवालाचा निष्कर्ष स्पष्ट करतो की, ही ताकद भारताला पूर्ण सुरक्षित बनवत नाही. भारतासाठी चीन ही प्राथमिक रणनीतिक आव्हान असून पाकिस्तान हे दुय्यम पण सातत्याने त्रास देणारे संकट आहे. ही बाब आपल्या धोरणकर्त्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. भारताला दोन आघाड्यांवरील युद्ध लढण्यासाठी सज्ज रहावे लागेल. यासाठी भारताची पुढची पावलं काय असावीत हे ठरणे गरजेचे आहे. चीन व पाकिस्तानच्या आधुनिकीकरणाच्या तुलनेत भारतालाही आपले तंत्रज्ञान व साधनसामग्री अद्ययावत करणे आवश्यक आहे. क्षेपणास्त्रे, सायबर संरक्षण, ड्रोन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी लागेल. सैन्यातील जवानांचे प्रशिक्षण व मानसिक तयारी या दोन्ही गोष्टी नव्या पिढीच्या युद्धशैलीशी सुसंगत असायला हव्यात. अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश यांच्यासोबतची मैत्री भारताच्या सुरक्षिततेसाठी अनमोल आहे. चीन-पाकिस्तान आघाडीवर राजनैतिक दबाव आणण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय मंचांवर आपले स्थान बळकट करणे गरजेचे आहे. उत्तरेकडील सीमाभागांमध्ये रस्ते, पुलं, संरक्षण केंद्रं यांचा विकास त्वरित करणे आवश्यक आहे. अशी सज्जता केल्याशिवाय आपण आपल्या देशाच्या सर्व बाजूने रक्षण करू शकणार नाही, हे नक्की.

# पर्यावरण : आव्हाने आणि अपेक्षा



दरवर्षी ५ जुन हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो. सन १९७२ मध्ये मानवी पर्यावरण या विषयावर संयुक्त राष्ट्रसंघातर्फे संयुक्त राष्ट्र महासभेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेदरम्यान जागतिक पर्यावरण दिन सुचवला गेला आणि ५ जून १९७३ पासून तो साजरा करण्यास सुरुवात झाली . आज रोजी १४३ पेक्षा जास्त देश दरवर्षी यात सहभागी होतात आणि अनेक सरकारी, सामाजिक आणि व्यावसायिक लोक पर्यावरण संवर्धन, संरक्षण, समस्या इत्यादींबद्दल बोलतात, चर्चा करतात आणि अनेक उपक्रम राबविले जातात, अनेक कार्यक्रम होतात. दरवर्षी एका देशाला याचे यजमानपद दिले जाते व एक थीम ठरवुन त्यावर वर्षभर कार्य केले जाते. सन २०२५ चे यजमानपद दक्षिण कोरियाला मिळाले आहे व थीम प्लास्टिक पोल्युशनाचे समुळ उच्चाटन आहे. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त या वर्षी जगभरातील समुदायांना उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यांचे समर्थन करण्यासाठी एकत्रित केले जात आहे. जागतिक पर्यावरण दिन प्लास्टिक प्रदूषणाच्या परिणामांवरील वाढत्या वैज्ञानिक पुराव्यांवर प्रकाश टाकेल आणि प्लास्टिकचा वापर नाकारण्यासाठी, कमी करण्यासाठी, पुनर्वापर करण्यासाठी आणि पुनर्विचार करण्यासाठी गती वाढवेल. जागतिक प्लास्टिक प्रदूषण करारा द्वारे प्लास्टिक प्रदूषण संपवण्यासाठी २०२२ मध्ये केलेल्या जागतिक वचनबद्धतेलाही ते बळकटी देईल.लोक एकल-वापर किंवा डिस्पोजेबलवर जास्त अवलंबून राहण्यापासून मुक्त असले पाहिजे कारण त्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम आहेत. आपण आपली नैसर्गिक ठिकाणे, आपले वन्यजीव आणि आपले स्वतःचे आरोग्य प्लास्टिकपासून मुक्त केले पाहिजे . आज जगात १० बिलीयन टन प्लास्टिक तयार झाले आहे व यापैकी १० टक्के सुध्दा प्लास्टिकचा पुनर्वापर केला जात नाही ही खुप गंभीर बाब आहे. प्लास्टिक संदर्भाने भारताची परिस्थिती अतिशय गंभीर आहे कारण आजघडीला भारत जगातील सर्वात जास्त प्लास्टिक तयार करणारा देश आहे. भारतात दरवर्षी ७ मिलीयन टन प्लास्टिक तयार होते हा खुप मोठा आकडा आहे.तसेच भारत सरकारने २०२२ पर्यंत भारतातील सर्व प्लास्टिकचा एकल वापर दूर करण्याचे वचन दिले होते. पण आजची परिस्थिती पाहता आपण उद्दिष्टा पासुन शेकडो मैल दूर असल्याचे दिसते.

भारतीय संस्कृतीमध्ये मानव जातीसोबतच प्राणी, पर्यावरण व निसर्ग यांना समान महत्त्व दिले आहे. म्हणुनच आपल्याकडे सणावाराला पशु, पक्षी, वृक्ष, वनस्पती, पाणी, धरती, सुर्य, चंद्र यांच्या पुजनाची परंपरा आहे. जगामध्ये औद्योगिकरण सुरू झाले आणि जसा त्याचा वेग वाढत गेला तसे निसर्गाकडे दुर्लक्ष केले गेले आणि विकासाच्या व संपत्तीच्या लालसेपोटी निसर्गावर अत्याचार सुरू झाले. याचे विपरीत परिणाम मागील काही दशकांत दिसुन आले आहेत, पण आता मात्र समस्त मानव जातीला मोठे हादरे बसायला सुरुवात झाली आहे व यामुळे संपूर्ण जग चिंतातूर झाले असून उपाय शोधण्याचा व जनजागृती करण्यासाठी प्रारंभ झाला आहे. याचाच भाग म्हणून दरवर्षी ५ जुन हा दिवस पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो .

पाच वर्षे पुर्वी कोरोना महामारीकाळात स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत पर्यावरणाचं महत्त्व कधी नव्हे इतकं लक्षात आलं आहे. जागतिक तापमानवाढ हा मानवजातीसमोरील सर्वाधिक मोठा धोका आहे. भारताने यासंदर्भात पावले उचलण्यास सुरूवात देखील केली आहे. पर्यावरणात प्रदूषित घटकांची वाढ होत आहे, जे आपल्या आरोग्यासाठी घातक आहे. म्हणूनच ज्या पृथ्वीशिवाय आणि पर्यावरणाशिवाय आपण जगू शकत नाही ते पर्यावरण निकोप राहण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत, याबाबतची जागृती या दिवसाच्या निमित्ताने केली जाते. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश पर्यावरणाबाबत लोकांमध्ये जनजागृती करणे हा आहे. निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पर्यावरण आणि मानवी जीवन यांच्यातील नातेसंबंधांबद्दल बोलायचे तर ते एक अतूट नाते आहे, ज्यात निसर्गाने मानवाला सर्व काही दिले आहे. मात्र, निसर्गाप्रती असलेल्या जबाबदारीच्या नावाखाली आपण ना त्याचे नीट संरक्षण केले आणि ना भविष्याची चिंता. त्याचाच परिणाम म्हणून आज जग प्रदूषित पर्यावरण आणि नैसर्गिक आपत्तींच्या कोपाखाली गाडले जात आहे. गेल्या काही वर्षांत पर्यावरणाची गंभीरपणे बिघडत चाललेली स्थिती शास्त्रज्ञांना समजली आहे आणि त्यामुळेच सर्वसामान्यांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने जगभरातील पर्यावरणवादी एका व्यासपीठावर एकत्र आले आहेत. पर्यावरणात प्रदुषित घटकांची वाढ होत आहे, जे आपल्या आरोग्यासाठी घातक आहे. म्हणूनच ज्या पृथ्वीशिवाय आणि पर्यावरणाशिवाय आपण जगू शकत नाही ते पर्यावरण निकोप राहण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत, याबाबतची जागृती या दिवसाच्या निमित्ताने केली जाते. पर्यावरण संतुलनासाठी जागतिक पातळीवर, देश पातळीवर, राज्यस्तरावर, शहर पातळीवर अनेक उपक्रम व उपाय केले जात आहेत. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमातून या बाबतीत संदेश दिला आहे. तसेच ५ जुन रोजी पर्यावरण दिनानिमित्त एक पेड माँ के नाम या कार्यक्रमाची सुरुवात मागील वर्षी केली आहे. पण यामध्ये आपल्या सर्वांचा सहभाग गरजेचा आहे. तेंव्हा मी एक नागरिक म्हणून काय करावे असा प्रश्न पडला असेल तर खालील छोट्या छोट्या गोष्टी द्वारे आपण आपले योगदान यासाठी देऊन मोलाचे सहकार्य करु शकता.

या वर्षीच्या पर्यावरण दिनी तुम्हाला पाच छोटे संकल्प सांगतो तुम्ही ते जर का पुर्ण केले तर त्याचे फळं तुमच्या पुढच्या पिढीला नक्की भेटेल.

१) तुम्हाला पहिला संकल्प असा करायचा आहे की, मी माझ्या घरातून निर्माण होणारा कचरा योग्य ठिकाणी पोहचवण्याचा प्रयत्न करेल. कचरा इकडे तिकडे न टाकता तो कचराकुंडीत टाकेल. आणि घरातील कचऱ्याचे सुका कचरा व ओला कचरा अशी विभागनी करेल.

२) तुम्हाला दुसरा संकल्प असा करायचा की, माणसाचे जीवन श्वासोच्छवासाने चालते आणि श्वास घेण्यासाठी शुद्ध हवा लागते. त्यामुळे जागतिक पर्यावरण दिनी श्वास घेण्यासाठी शुद्ध हवा सर्वत्र पसरवण्याचा प्रयत्न करू, त्यासाठी पेट्रोल-डिझेलऐवजी ई-वाहन वापरू. आणि दैनंदिन जीवनात अधिकाधिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करु.

३) तुम्हाला तिसरा संकल्प असा करायचा आहे की, निसर्ग हा झाडे आणि वनस्पतींवर अवलंबून आहे. मात्र आजकाल प्रचंड वृक्षतोड वाढली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांच्या कत्तली होत आहे अन याचा परिणाम ऑक्सिजनच्या कमतरतेबरोबरच हवामानावर होऊन ऋतूचक्रही बिघडत आहे. त्यामुळे अनेक भीषण नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत आपण एक कुटुंब एक झाड ही संकल्पना राबवावी व पर्यावरण दिनी एक देशी झाड लावून त्यांचे वर्षभर संगोपन करावे.

४) तुम्हाला चौथा संकल्प असा करायचा की तुमच्या अवतीभोवतीची नैसर्गिक साधन संपत्ती जसे की झाडे, रोपे, माती, प्राणी, पाणी,नदी इत्यादींचा पर्यावरण स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात महत्त्वाचा वाटा आहे. त्यामुळे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करत पर्यावरणाचा समतोल सदैव राखला जावा, अशी प्रार्थना करा आणि पर्यावरणाचा समतोल व सुरक्षित ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल, ते सर्वकाही करण्यास आम्ही सदैव तयार राहु अशी प्रतिज्ञा करा.

५) तुम्हाला शेवटचा अन पाचवा संकल्प असा करायचा की, आम्ही पॉलिथिन किंवा प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्याचा प्रयत्न करू. पॉलिथिन आणि प्लास्टिक हे निसर्गाचे सर्वात मोठे शत्रू आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही स्वतः त्यांचा वापर करणार नाही, त्याचप्रमाणे तुम्हाला कुणी इतर पॉलिथिन किंवा प्लास्टिक वापरताना दिसले तर त्यांनाही पर्यावरणाबाबत जागरूक करु आणि शक्य होईल तेवढी नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करु. लक्षात ठेवा की पृथ्वी ही एकच आहे तिला आपल्या मातेसमान माना आणि आपल्या मातेसाठी जे काही करतो ते सर्व तिच्या साठी करा. पृथ्वी माता, धरतीमाता जर कोपली तर संपूर्ण मानव जातीला प्रचंड विध्वंस पाहावा लागेल त्यामुळे पर्यावरणाचे महत्त्व ओळखून त्याचे संतुलन राखण्यासाठी सहकार्य करावे असे कळकळीचे आवाहन आपणा सर्वांना करावेसे वाटते.

-प्रा. डॉ. अनिल मुगुटकर
बहिर्जी स्मारक महाविद्यालय
वसमत
मो. ९८२२४७६६११

# जागतिक पर्यावरण दिन

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात (युनो) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program (UNEP) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले.

आंतरराष्ट्रीय पर्यावरणविषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर आयोजित करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान



बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले.

२०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते. २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला.

मागील वर्षी म्हणजे २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. मागील वर्षी सौदी अरेबिया हा जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. या वर्षी म्हणजे २०२५ साली दक्षिण कोरिया जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषण थांबवा ही यावर्षीची थीम आहे. या थीमचा संदेश आहे की प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जागतिक स्तरावर एकत्र येऊन काम करणे. UNEP नुसार पप्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे, जी पर्यावरणास आणि मानवी आरोग्यास धोकादायक आहे. आजच्या दिवसाचे औचित्य साधून जगभर प्लास्टिक प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास आणि प्लास्टिक मुक्तीचा ध्यास घेतल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

# संघर्षातून उत्कर्ष शोधणारा कार्यकर्ता : जीवन घोगरे पाटील

नांदेड जिल्ह्याच्या राजकारण आणि समाजकारणात १९९५ पासून एकनिष्ठ काम करणारे एका शेतकरी कुटुंबातील सामान्य कार्यकर्ता अशी जीवन घोगरे पाटील यांची खरी ओळख आहे. राजकीय गुरू महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांच्या छत्रछायेखाली त्यांनी राजकीय प्रवासाला खऱ्या अर्थाने प्रारंभ केला. त्यांच्या आशीर्वादामुळे १९९९ मध्ये राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर पहिल्यांदा जीवन घोगरे यांना वाघाळा शहराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

एक कार्यक्षम, दूरदृष्टी आणि प्रामाणिक कार्यकर्ता ही त्यांची जमेची बाजू असल्याने त्यांनी कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली आहे. एवढेच नव्हे तर पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या जबाबदाऱ्या अगदी नेटाने पार पाडण्याची त्यांची खुबी असल्यामुळे पक्षश्रेष्ठींचाही त्यांनी विश्वास संपादन केला आहे. विरोधी पक्षनेता म्हणून काम करताना त्यांनी अनेकदा आक्रमक भूमिका घेतली.महानगरपालिकेचे अनेक प्रश्न सोडवितानाच त्यांनी २००८ मध्ये गुरु-त्ता-गद्दी सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात विकास निधी आला होता होता.

जिल्हाध्यक्षपदासाठी इच्छूक असतानाही कालांतराने त्यांना जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. २०१४ मध्ये नांदेड दक्षिण विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी होती, परंतु त्यासाठी पक्षांतर करण्याची मोठी अडचण निर्माण झाल्यामुळे ती



संधी हुकली. आपल्या स्वार्थासाठी एक ना अनेक पक्ष बदलून आपली राजकीय पोळी भाजून घेणाऱ्या नेत्यांची गर्दी वाढत असताना पक्षांतर नको 'पक्षासाठी वाट्टेल ते..' या मतावर ते ठाम राहिले आणि एकनिष्ठ कार्यकर्ता काय असतो, याचा आदर्श त्यांनी राजकीय पटलावर ठेवला आहे. जीवन घोगरे पाटील यांच्या राजकीय आयुष्यात संघर्ष कायम राहिला, परंतु कुठेही न डगमगता त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम अखंडपणे सुरुच ठेवले.दरम्यानच्या काळात त्यांना अनेक संघर्षमय समस्यांना सामोरे जाण्याची वेळ आली. तरीही ध्येय आणि निष्ठा कायम ठेवून पुढे कार्यरत राहिले. कुठलाही राजकीय वारसा नसताना संघर्षमय जीवन ते लढत राहिले. दरम्यानच्या काळात अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचा स्वतंत्र गट निर्माण झाला आणि जीवन घोगरे यांनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला.

जीवन घोगरे यांची काम करण्याची पद्धत आणि प्रामाणिकता पाहून अजित दादांनी त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना जीवन घोगरे यांनी पक्षसंघटनात्मक बांधणीवर जोर दिला. मोठ्या प्रमाणावर सभासद नोंदणी करून त्यांनी पक्षसंघटन मजबत केले.

जीवन घोगरे पाटील यांनी २०२४ च्या विधानसभेची पूर्ण तयारी केली होती. राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली असता त्यावेळी नांदेड दक्षिण विधानसेसाठी जीवन घोगरे यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक चर्चाही झाली. दादांनीही उमेदवारीसाठी हिरवा कंदील दाखवला. परंतु महायुतीतील जागा वाटपात राष्ट्रवादीला लोहा-कंधारची जागा मिळाली. राष्ट्रवादीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या विजयासाठी जीवन घोगरे यांनी अथक परिश्रम घेवून या मतदारसंघात राष्ट्रवादीचा झेंडा फडकविण्यात मोलाची भूमिका बजावली. पक्षाध्यक्ष अजितदादा पवार यांचा आदेश शिरसावंद्य मानून पक्ष मोठा झाला पाहिजे, ही त्यांची धडपड कौतुकास्पद आहे. संघर्षातून उत्कर्षाची यशस्वी वाटचाल करणारे जीवन घोगरे पाटील यांचा आज वाढदिवस. यानिमित्त त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

- रमेश पांडे

# सर्व समाजात बंधुभाव रुजवणारे नेतृत्व : बापूराव गजभारे

५ जून हा आंबेडकरी चळवळीतील नेते बापूराव गजभारे यांचा जन्मदिन. पीपल्स रिपब्लिकन पार्टीची मुलुखमैदानी तोफ व नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक, राजकीय पटलावरील एक बहुआयामी व्यक्तीमत्त्व असलेले बापूराव गजभारे यांचा वाढदिवस दरवर्षी साधेपणाने व समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा केला जातो. त्यांचा मनमिळावू स्वभाव कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना भुरळ घालणारा आहे. आपल्या कार्याचे योग्य नियोजन करून अगदी उत्तम पद्धतीने कार्य पार पाडणे एवढेच ते पाहतात. त्यांचा हा हातखंडा भल्या भल्यांना जमत नाही. त्यामुळे कोणतेही काम ते अगदी सहज शक्य करून दाखवतात. म्हणून त्यांचे सहकारी म्हणतात की, बापू है तो मुमकीन है.

महाविद्यालयीन जीवनात एक संघर्षशील युवक म्हणून त्यांची कारकीर्द सुरु झाली. आजपासून पस्तीस-चाळीस वर्षापूर्वी रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील दलित पँथर ही एक लढाऊ संघटना होती. तसाच स्वभाव असल्यामुळे बापूराव पँथरकडे आकर्षित झाले. पँथरकडून आठवलेंच्याच आरपीआयमध्ये काम करत बापूरावांची राजकीय कारकीर्द सुरु झाली. आजघडीला ते प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे म्हणजे पीआरपीचे प्रदेश महासचिव आहेत. बापूरावांच्या राजकारणात बरेच चढउतार आले. पण प्रत्येक प्रसंगाचा त्यांनी मोठ्या धीराने सामना केला. नगरसेवकपदाच्या तिसऱ्या प्रयत्नात ते बहुमतांनी निवडून आले.

गेल्या तीस - पस्तीस वर्षांच्या राजकारण व समाजकारणात



त्यांनी नांदेड शहर व जिल्ह्यातील असंख्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. नगरसेवक असतानाही त्यांनी लोकहिताचे अनेक प्रस्ताव सादर करुन मंजूर करुन घेतले.त्यातील केवळ दोन मुद्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. एक म्हणजे म. फुले परिसरातील मोकळी जागा खाजगी बिल्डर्सच्या घशात घालण्याचा प्रयत्न बापूरावांनी मनपामध्ये त्या विरोधात ठराव मांडून हाणून पाडला. त्या जागेवर बिल्डर्सनी उभे केलेले टीनशेड हटवणे मनपाला भाग पाडले. फुले पुतळ्याच्या परिसरात कोणतेही अतिक्रमण होवू नये, एवढीच त्यांची प्रामाणिक इच्छा होती. त्यांचा तो लढा कोणत्याही बिल्डरच्या किंवा कोणत्याही जातीच्या विरोधात नव्हता. तर फुले पुतळ्याचे पावित्र्य जपण्याचा त्यांचा हेतू होता.

दुसरी बाब म्हणजे गोदावरी नदीकाठी डंकीन येथील विपश्यना केंद्राच्या बाजूला ५ एकर जागेवर विश्वशांतीचे अग्रदूत महाकारुणिक भगवान बुद्ध यांची १०५ फुट उंच भव्य मूर्ती उभी करण्याचा प्रस्ताव त्यांनी मनपामध्ये मंजूर करवून घेतला. त्यांचा हा ठराव म्हणजे बौद्ध अनुयायांना आगळीवेगळी भेटच म्हणावी लागेल. यासाठी शंभर कोटीचा निधी देण्याची मागणी तत्कालीन खा. प्रताप पाटील चिखलीकर यांनी राज्य शासनाकडे केली होती. तर आता पीआरपीचे अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे, आ. भीमराव केराम यांनी भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो व भ. पंय्या बोधी थेरो यांना सोबत घेऊन या विषयावर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना भेटून मंजुरी मिळवून घेण्याचे ठरवले आहे

जिल्हा नियोजन समितीवर असताना तत्कालीन पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या समोर हा विषयी आला होता.त्यांनी अधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बापूराव हे डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनचे ते संस्थापक आहेत. मागील तेवीस वर्षापासून कृष्णाई पत्रकारिता पुरस्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्काराचे वितरण केले जाते. या माध्यमातून अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन समाज मनावर एक वेगळीच छाप पाडली आहे. कोरोना काळात लसीकर मोहीम आणि स्वखर्चातून भोजनदान उपक्रम त्यांनी राबविला. जात, धर्म, पंत या सर्वांपलीकडे त्यांची अजातशत्रू म्हणून ख्याती आहे. एखादा विषय समजून घेण्यासाठी ते सर्व समाजातील बुद्धिजीवी लोकांची मते जाणून घेऊन निर्णय घेतात. म्हणून बापूरावांबद्दल सर्व समाजांमध्ये व बुद्धीजीवींमध्ये आदराची भावना आहे.

-मारोती भु. कदम,
नांदेड.

## थोडक्यात...

### शेख अजिज शेख नूर सेवानिवृत्त

**नरसी (प्रतिनिधी)–** नायगांव डाक कार्यालयात ग्रामीण डाक सेवक शेख अजिज शेख नूर हे वयाच्या ६५ व्या वर्षी तब्बल ३५ वर्ष डाक विभागात सेवा करून सेवानिवृत्त झाले. शेख अजिज यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूर्व उप-विभागाचे सहायक डाक अधीक्षक अरूण गायकवाड हे होते. तर डाक पतसंस्थेचे चेअरमन जी. बी. भिलवंडे, बळवंत शिंदे, मोरे, कल्पे यांच्या उपस्थितीत शेख अजिज, पी. एन. बरडे, मामीडवार, शेख बाबु, जाधव, गजभारे, काचेबोईनवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अक्षय कुलकर्णी, प्रविण शिंदे, उल्हास शिंदे, केशव शिंदे, आशुतोष नरभागे, हरिदास बोईनवाड, सुनिल घोरपडे, लक्ष्मण मरकडवाड, अंकुश मनुरकर, कृष्णा इंगोले, संजय राठोड, अमोल तोटे, देविदास मोरे, कांचन तारू, रविना जाधव, सत्यभामा चिंतले, सुकेशनी पुयड, वनीता बडुरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### मुदखेड नगर परिषदेमध्ये गुणवंतांचा सत्कार

**मुदखेड (प्रतिनिधी)** – येथील नगर परिषदेत मुख्य धिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे चौघांना शासकीय सेवेत नोकरी मिळाली. साईनाथ आसकुलकर, केशव गोत्रम, सुमित अनमवाड, अजय मुंगल या गुणवंताचा मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी पाणीपुरवठा अभियंता अनंत कुलकर्णी, सुशील खिलारे, आजिम साब, लेखा अधिकारी शशिकांत पोळ, दिलीप पवार, मोहन कवळे, रमेश सावंत, गणेश वडे, बाळु पांचाळ, सचिन चुचे, राहुल चौदंते व अनेकांची उपस्थिती होती.

# कुषावाडी, होट्टल, काठेवाडी, पाटोदा खुर्द, पाटोदा व चिकना गावात विकसित कृषि संकल्प अभियान

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी आणि जैविक शेतीला चालना देण्यासाठी विकसित कृषि संकल्प अभियान यशस्वीपणे सातव्या दिवशी पोहोचले. या उपक्रमाद्वारे शाश्वत शेतीसाठी जैविक संसाधनांचे महत्व अधोरेखित करण्यात आले आहे, अशी माहिती सगरोळीच्या कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख यांनी दिली.

या अभियानाच्या सातव्या दिवशी तज्ज्ञ आणि कृषी मार्गदर्शकांनी ७ हजार ३६८ गावांचा दौरा केला. जिथे ७.९५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना जैविक शेती, मृदा आरोग्य, नैसर्गिक खतांचा वापर आणि जलवायु अनुकूल शेती तंत्रज्ञान याबद्दल माहिती देण्यात आली.

बुधवारी हे अभियान देगलूर तालुक्यातील कुषावाडी, होट्टल, काठेवाडी आणि धर्माबाद तालुक्यातील पाटोदा खुर्द, पाटोदा बुद्रुक व चिकना या गावी प्रभावीपणे पार पडले.

## शाश्वत शेतीसाठी जैविक संसाधनांचे महत्व



मृदा आरोग्य राखणे, रासायनिक घटकांचा अतिरेक टाळणे आणि सेंद्रिय शेतीच्या संधीचा विकास हे या अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. शेतीतील जैविक संसाधनांचा प्रभावी वापर केल्यास उत्पादनाची गुणवत्ता वाढते तसेच मृदाची सुपीकता आणि जलसंधारण सुधारते, असे शेतकरी वैज्ञानिकांनी सांगितले.

या अभियानात कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी येथील तज्ञांची दोन टीम्स सहभागी झाल्या असून, त्यांनी गावोगावी फिरून शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीसाठी आवश्यक उपाय आणि तंत्रज्ञान यांचे मार्गदर्शन केले.

या अभियानात राष्ट्रीय डाळिंब संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शिरगुरे आणि राहुल डमाळे, ऊस संशोधन शास्त्रज्ञ डॉ. थोरात आणि डॉ. बोरसे तसेच संस्कृती संवर्धन मंडळ संचालित कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. कपिल इंगळे, डॉ. माधुरी रेवणवार आणि डॉ. प्रियंका खोले यांनी हवामान अनुकूल शेती, पीक विविधता आणि जैविक शेतीच्या संधी यावर सखोल मार्गदर्शन केले.

तसेच प्रभुदास उडतेवार, बालाजी चंदापुरे, प्रशांत शिवपणोर आणि संतोष लोखंडे उपस्थित होते. शायकीय योजनांची प्रभावी लाभ घेण्यासाठी कृषि विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय कापूस संशोधन केंद्राचे प्रख्यात तज्ज्ञ डॉ. चींचाने यांनी कापूस उत्पादनासाठी सुधारित तंत्रज्ञान, जैविक संसाधनांचा प्रभावी वापर आणि आधुनिक व्यवस्थापन यावर विशेष मार्गदर्शन केले.

विकसित कृषि संकल्प अभियानाच्या सातव्या दिवशी शेतकरी, तज्ज्ञ आणि कृषी संस्थानी एकत्र येऊन जैविक शेतीच्या प्रवासाला गती देण्याचा निर्धार केला. आगामी दिवसात याला अधिक व्यापक स्वरुप देण्यासाठी शासन आणि संस्थात्मक पातळीवर निर्णय घेतले जातील. शाश्वत शेती आणि जैविक संसाधनांच्या प्रभावी वापरामुळे पर्यावरण अनुकूल शेतीस चालना मिळेल, याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

# स्पर्धेच्या काळात तरुणांना व्यवसायात मोठ्या करिअरच्या संधी –प्रणिता चिखलीकर



**लोहा (प्रतिनिधी)–** आजच्या काळात सरकारी नौकरीसाठी प्रचंड स्पर्धा आहे.अशा परिस्थितीत स्वतः चा व्यवसाय उभा करून त्यात करिअर करता येईल. रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. आपण निवडलेल्या व्यवसायाला आधुनिकतेचा टच देऊन त्यात यश मिळविता येते, असे मत भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणितताताई देवरे चिखलीकर यांनी व्यक्त केले

लोहा शहरात आयोजित एका कार्यक्रमात भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा प्रणिता देवरे – चिखलीकर बोलत होत्या.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष दत्ताजी वाले, माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, अवि पाटील पवार, अशोक सोनकांबळे, सिकंदर शेठ, रशिदखॉ पठाण, आलमखॉ पठाण, अहेमद शेख, ऐजाज शेख, रमजान पठाण, सोहेल पठाण काबेगांवकर, अरबास शेख, रज्जाक शेख, खोलेद पठाण, समीर शेख, सरफराज लदाफ, ताहेर पठाण, अयान शेख, साहिल शेख, साहील पठाण व अजीस शेख आदींची उपस्थिती होती.

प्राणिता देवरे-चिखलीकर म्हणाल्या की, आज प्रचंड स्पर्धा आहे. सरकारी नौकरीसाठी जागा मोजक्याच आणि हजारो विद्यार्थी परीक्षेसाठी असतात. अशा स्पर्धेत सगळ्यांनाच संधी मिळणार नाही. म्हणून तरुणांनी रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजेत. मेहनत जिद्द, चिकाटीतून तसेच दर्जे दारपणा व्यवसायाला भरभराटी देते. तरुणांच्या त्यांचा आदर्श घेण्याची गरज आहे, असेही शेवटी प्रणिता देवरे – चिखलीकर म्हणाल्या.

# विविध मागण्यांसाठी ‘बीएसएनएल’च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)–** बीएसएनएल अर्थात भारत संचार निगम लिमिटेडच्या प्रशासनाकडून महाराष्ट्र व गोवा परिमंडळामधील सेवानिवृत्त अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांवरील अन्यायाविरुद्ध ऑल इंडिया ‘बीएसएनएल’ व डीओटी पेन्शनर्स असोसिएशनने नांदेडच्या टेलिफोन भवनसमोर आंदोलन केले.

‘बीएसएनएल’ मधील जवळपास २०० कर्मचाऱ्यांना जात पडताळणीच्या नावाखाली त्यांचे हक्काचे पैसे दिले जात नाहीत. त्यांचा मानसिक छळ करण्याचं काम प्रशासनाकडून होत आहे. २०१९ मध्ये ‘व्हीआरएस’च्या माध्यमातून व्हिजिलन्स क्लिअरन्स देऊनही त्यांना टार्गेट करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना दिले नाही. जात पडताळणीसाठी त्यांच्यावरती दबाव आणून त्यांना नाहक त्रास देण्याचे काम ‘बीएसएनएल’ मॅनेजमेंट करत असल्याचा आरोप करण्यात आला. आंदोलनात प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी करून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकर सोडवा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला. आंदोलनात कॉ. मारुती रायलवाड, राजेंद्र वानखेडे, लालू कोडलवाडे, देविदास फुलारी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन नांदेड ‘बीएसएनएल’चे उपमहाप्रबंधक श्रीकांत यांना देण्यात आले.

# ईदच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक

**माहूर (प्रतिनिधी)–** ईदच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलीस प्रशासनाच्या वतीने मंगळवार दि. ३ जून रोजी येथील पोलीस ठाण्यात शांतता कमिटी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, नगीना मशीदचे सदर ताहेर आली, जामाचे मशीद नसीर जलाल, गौशिया मशीदचे जमीर मलनस, मदिना मशीदचे गफूर सौदागर, नगरसेवक प्रतिनिधी निसार कुरेशी, असलम छायटीया, वाशिम कुरेशी, करीम शहा, फयाज शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक पालसिंग ब्राह्मण, जमादार चौधरी, गोपनीय शाखेचे जाधव यांची उपस्थिती होती.



बकरी ईद सण उत्साहात साजरा करावा, कायद्याने संमती दिलेल्याच प्राण्यांची कुर्बानी द्यावी व कायद्याचे पालन करावे, कोणाच्या भावना दुखणार नाही, याची काळजी घ्यावी. सण साजरा करताना पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी व्यक्त केले.

भाईचारा – जातीय सलोखा नेहमीच अबाधित ठेवण्याची आपल्या शहराची परंपरा आहे. ती कायम ठेवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत. पोलीस प्रशासनाला सहकार्य करीत उत्सव आनंदात साजरे करावे. आपल्या एखाद्या कृत्यामुळे संपूर्ण समाजालाच अपमानित व्हावे लागेल किंवा समाजावरच आक्षेप येईल असे कृत्य कोणीही करू नये, असे आवाहन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केले. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी कायदा तोडणाऱ्या काही चुकीच्या कृत्यांमुळे पोलिसांना गुन्हे दाखल करावी लागतात. याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला, कुटुंबाला भोगावे लागतात. त्यामुळे आपल्या हातून कायद्याचा भंग होणार नाही असेच आपले आचरण ठेवावे. बकरी ईद आनंदात व शांततेत साजरी करावी. व्हाट्सअप, फेसबुक या माध्यमांचे वापर करताना इतर धर्माच्या भावना दुखावल्या जातील असे संदेश किंवा पोस्ट टाकू नयेत. प्रत्येक समाजामध्ये समाज विघातक वृत्तींची काही लोक असतात, त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे, मात्र याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला, कुटुंबाला भोगावे लागतात याची जाणीव ठेवावी, माहूर शहराचा सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता अबाधित आगामी बकरी ईद शांततेत साजरी करावी असे मत सपोनि मुळे यांनी व्यक्त केले.

# श्री गुरु हरगोविंद साहिब महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिख धर्माचे सहावे धर्मगुरू श्री हरगोविंद साहिबजी यांच्या ४३० व्या जयंती निमित्त दि.६ जून ते १२ जून दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू ग्रंथ साहिबजी, श्रीदसम ग्रंथ साहिब जी, श्री सरबलोह ग्रंथ साहिबजी श्री चौपई साहिबचे पाठ होणार आहे. नगरकिर्तनाने कार्यक्रमांचा समारोप होणार आहे, अशी माहिती हजुरी साथ संगत व हजुरी क्रांती सघटनांचे अध्यक्ष मनप्रीत सिंघ कुंजीवाले यांनी दिली आहे.

गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघजी, समुह पंजप्यारे साहिब यांच्या आशीर्वादाने व बाबा नरिदंरसिंघजी व बाबा बलविंदर सिंघ लंगर साहिब (कार सेवा वाले) व माता साहिब देवाजीचे जत्थेदार बाबा तेजासिंघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू हरगोविंद साहिब यांच्या जंयतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सहाववे गुरु हरगोविंद साहिबजी यांची जयंती १२ जून रोजी साजरी करण्यात येत आहे. त्या निमित्ताने फतेह सिंघजी मंगल कार्यालय अबचल नगर कॉलनी येथे सात दिवस दर रोज कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

दुपारी ३.३० ते ५ च्या दरम्यान सुखमनी साहिबचे पाठ व सायंकाळी ८ ते ९ वाजता दरम्यान श्री गुरू हरगोविंद साहिब यांच्या जीवन कथा, कथाकार, ज्ञानी सरबजीत सिंघ निर्मले व ज्ञानी नाहर सिंघ हे सादर करणार आहेत. दररोज कथेच्या नंतर सायंकाळी ९ ते ९.३० पर्यंत नाम सिमरणचे पाठ होणार असून त्यानंतर लंगर प्रसादाचे आयोजन केले आहे. दि. ७ जून व ८ जून रोजी सकाळी ११ वाजता आर्चरी (धनुष्यबान) प्रतियोगिता व दि. ९ जून ते १० जूनपर्यंत खुला गतका प्रतियोगिताचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १२ जून रोजी सप्ताह पाठच्या समाप्ती होईल. या कार्यक्रमांना सर्व साथ संगतने मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कार्यक्रम व लंगर प्रसादाचा लाभ घेऊन महाराजांचे आशिवार्द प्राप्त करावेत, असे आवाहन हजुरी क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# वडगावात दिवसा घरफोडी; साडेतीन लाखांचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील वडगाव बुद्रुक येथे भरदिवसा घर फोडून चोरट्यांनी सोन्याच्या- दागिन्यांसह रोख रक्कम असा साडेतीन लाखाचा ऐवज लंपास केला. ही घटना सोमवारी दि.२ रोजी सायंकाळी उघडकीस आली.

वडगाव येथील विठ्ठल ज्ञानोबा वाठोरे हे सोमवारी सकाळी पेरणीपूर्व कामासाठी शेतात कुटुंबीयांसह गेले होते. दुपारी तीनच्या सुमारास त्यांचा मुलगा ज्ञानोबा हा ताम सा येथून जेवणासाठी घरी गेला. घराचे दार उघडे बघून ज्ञानोबाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. घरातील सासू व सुनेच्या कपाटातून चोरट्यांनी सोन्याच्या दोन अंगठ्या, सोन्याचे झुंबर, कर्णफुले, मंगळसूत्र असे अडीच तोळ्यांच्या दागिन्यांसह रोख ७५ हजार रुपये गायब केले. हा प्रकार ज्ञानोबाने कुटुंबीयांना सांगितल्यानंतर त्यांना धक्काच बसला.

ज्ञानोबा वाठोरे यांच्या तक्रारीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. वाठोरे कुटुंबाने पेरणीसाठीचे बी-बियाणे खरेदी करण्यासाठी रोख रक्कम जमविली होती. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली. घटनास्थळी श्वानपथक पाचारण करण्यात आले होते. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर करत आहेत.

# अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या ११ गोवंशांना जीवदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात गोवंश कत्तल होणार नाही याची पोलिसांकडून दक्षता घेतली जात आहे. कत्तलीसाठी जाणाऱ्या ११ गोवंशाला इतवारा पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे व त्यांच्या पथकाने जीवदान दिले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी गुन्हेगारांना आळा घालण्याच्या पार्श्वभुमीवर अवैध जनावरे वाहतूक करणाऱ्या व्यक्तीविरुध्द कारवाई करण्या बाबत सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना आदेश दिले होते.

दरम्यान इस्लामपुरा देगलुर नाका भागात कांही इसम गोवंश



जातीचे जनावरे टिनपत्र्याच्या शेडमध्ये बांधून ठेवली असल्याची माहिती दि. २ जून रोजी इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे व गुन्हे शोध पथकाला मिळाली. त्यानुसार इस्लामपुरा भागात जाऊन पाहणी केली असता इस्लामपुरा भागात वेगवेगळया ठिकाणी आरोपीतांचे ताब्यात असलेले गोवंश जातीचे ११ जनावरे ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर ती जनावरे पोलीस स्टेशन इतवारा येथे आणण्यात आली. आरोपी शेख रहीम शेख खाजा राहणार इस्लामपुरा नांदेड आणि मोहम्मद जाकेर मोहम्मद फारूक राहणार साईनगर इतवारा नांदेड या दोघांविरूध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व भारतीय न्याय संहिता कायद्यान्वये दोन गुन्हे दाखल करण्यात आले. जप्त करण्यात आलेले एकुण ११ गोवंश जातीच्या जनावरांना गोशाळा येथे पाठविण्यात आले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना नवीन व नुतनीकरणाचे अर्जाबाबत सूचना

**नांदेड (प्रतिनिधी) –** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी नवीन व नुतनीकरण ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पध्दतीने तपासणी सुरु आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज अपूर्ण कागदपत्राअभावी त्रुटीत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे माहिती देण्यात येत असून, अर्ज त्रुटीत आलेल्या विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर तात्काळ माहिती व्यवस्थीत भरावी जेणेकरुन या वर्षीचा लाभ देणे सोयीचे होईल.

नांदेड जिल्ह्यातील सर्व स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही त्रयस्थ व्यक्तीशी संपर्क न साधता व कुठल्याही अमिषाला बळी न पडता प्रत्यक्ष संबंधीत कार्यालयातील स्वाधार विभागाशी संपर्क साधावा. तसेच या योजनेबाबत काही अडचणी असल्यास कार्यालयातील जबाबदार व्यक्तीकडे संपर्क करावा व माहिती घ्यावी. ही योजना थेट विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम वितरीत केली जाते. यामुळे आपण या बाबतीत जागृत राहून कार्यालयाबाहेर कुठल्याही यंत्रणेस संपर्क साधु नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# लोको पायलटांसाठी कुटुंबीय संवाद सत्राला प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात लोको पायलट व सहाय्यक लोको पायलट तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी एक विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचा उद्देश कर्मचाऱ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य, कर्तव्यनिष्ठा, तसेच त्यांच्या कुटुंबीयांची भूमिका याबाबत जागरूकता वाढवणे हा होता.

गाड्यांचे सुरक्षित व वेळेवर संचालन ही अत्यंत जबाबदारीची बाब असून, यासाठी जागरूकता, सतर्कता आणि नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. सत्रात या भूमिकेचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. थकवा व अपघात टाळण्यासाठी पुरेशी व गुणवत्तापूर्ण झोप अत्यावश्यक आहे. विश्रांतीसाठी शांत व स्वच्छ वातावरण असणे गरजेचे आहे, यासाठी कुटुंबीयांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

मानसिक तणाव कमी करणे, एकाग्रता वाढवणे व मनःशांती



मिळवण्यासाठी योग व ध्यान उपयुक्त आहेत. या बाबींचा रोजच्या जीवनशैलीत समावेश करण्याचे आवाहन करण्यात आले. कुटुंबातील आनंदी व समजूतदार वातावरण हे कर्मचाऱ्याच्या कार्यक्षमतेत मोठा वाटा उचलते. सुसंवाद व सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला.

विश्रांतीच्या वेळी सोशल मिडिया किंवा मोबाईलचा अतिरेक टाळावा. यामुळे झोपेची गुणवत्ता बिघडते व मानसिक थकवा वाढतो. नियमित व्यायाम, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य तपासणी यामुळे चांगले आरोग्य राखता येते. आजारांपासून संरक्षणासाठी या सवयी अंगीकारण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

वेळेवर व सकस अन्न सेवन केल्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि कर्तव्यात एकाग्रता राहते. कोणतेही औषध घेताना फक्त नोंदणीकृत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. स्वतःहून औषधोपचार केल्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतो.

आर्थिक अडचणीत मोबाईल ॲप्सवरून घेतले जाणारे कर्ज मानसिक तणावास कारणीभूत ठरते. अशा गोष्टींपासून दूर राहून योग्य आर्थिक सल्ल्याचा अवलंब करावा.

सत्राच्या अखेरीस कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी सक्रिय सहभाग घेतला. सत्रातून आरोग्य, मानसिक शांती व कार्यक्षमतेसाठी कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असल्याचे अधोरेखित झाले. रेल्वे प्रशासनाकडून अशा सत्रांचे आयोजन भविष्यातही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

# अमोल महामुनी यांचे आज नरहर कुरुंदकर अध्ययन व संशोधन केंद्रात व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री अमोल महामुनी हे दि ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता केंद्रात ‘पेटंटस अँड इनोव्हेशनस’ या विषयावर नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्रातील सभागृहात मार्गदर्शन करणार आहेत. श्री. अमोल महामुनी हे सायन्स कॉलेज नांदेडचे १९८२ च्या बॅचचे १२ वीला बोर्डात पहिले आलेले माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी त्यांनी श्री गुरुगोविंद सिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था येथून बी. टेक. आणि नंतर आयआयटी, वाराणशी मधून एम. टेक. केलेले आहे. ते ‘आयबीएम’ मधून निवृत्त झाले आहेत. विस्तारित नोकरीमध्ये किंड्रिल या ‘आयबीएम’च्या उप कंपनीत बेंगलोर येथे कार्यरत आहेत. त्यांच्या नावे १४ अमेरिकन पेटेंट्स आहेत. त्यांना आयटी क्षेत्रातील ३० पेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे. या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

# फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# पावसाळ्यात तेलकटपणा नाहिसे करणारे 10 मार्ग...



**पावसाळ्यात हवेत ओलावा जास्त असतो. त्यामुळे चेहरा पुन्हा पुन्हा स्वच्छ करावा लागतो. याशिवाय पावसाळ्यात अनेक प्रकारचे संसर्ग पसरतात. त्यामुळे आजारांसोबतच त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवतात. पावसाळ्याच्या दिवसात, त्वचेच्या छिद्रात घाण अडकणार नाहीत म्हणून दिवसातून दोन-तीन वेळा चेहरा धुणे गरजेचे असते. पण त्वचेची काळजी घेताना आपण छोट्या चुका करतो. या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकांचा परिणाम त्वचेवर खोल होतो. म्हणूनच या काळात तुम्ही त्वचेची काळजी घेणं गरजेचं असते. यासाठी तुम्ही आम्ही सांगत असलेल्या १० गोष्टी अंमलात आणा...**

1 पावसाळ्यात त्वचेची काळजी घेणं गरजेच असतं. या वेळी सौम्य क्लिंजर वापरावे. याशिवाय तुम्ही त्वचेला पपईदेखील लावू शकता.

2 जर तुमची त्वचा तेलकट असेल तर एक लहान चमचा पाण्यात लॅव्हेंडर तेल टाकून चेहऱ्याला लावा. यामुळे त्वचेला आराम मिळतो.

3 पावसाळ्यात तुम्ही रोज रात्री अँटी-बॅक्टेरियल टोनर लावून झोपावे. कारण ते त्वचेची पीएच पातळी योग्य ठेवते.

4 पावसाळ्यात बुरशीजन्य संसर्गाचा धोका खूप वाढतो. हे टाळण्यासाठी दिवसातून किमान दोन-तीन वेळा चेहरा धुवा. त्वचेला योग्य असेल असा फेसवॉश देखील लावू शकता.

5 शरीराला विषारी पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या. जेणेकरून मुरुम आणि मुरुम बाहेर येणार नाहीत.

6 मेकअपमुळे सौंदर्यात भर पडत असली तरी त्यामुळे त्वचेची खोल छिद्रे बंद होतात. मेकअप काढण्यासाठी बदाम तेलाचा वापर करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही खोबरेल तेल किंवा बेबी वाइप्सचा देखील वापरू शकता.

7 पावसाळ्यात त्वचेला एक्सफोलिएट करायला विसरू नका. यासाठी मध आणि साखरेचा स्क्रब वापरा. साखर मृत त्वचा काढून टाकून छिद्र बंद करण्यास मदत करते, तर मध त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि मऊ करते.

8 ग्रीन टी, लिंबू आणि काकडी यांसारखे नैसर्गिक टोनर वापरा. टोनिंगमुळे त्वचेतील काही घाणही निघून जाईल आणि त्वचा कोरडीही होणार नाही.

9 पावसात चेहऱ्याशिवाय पाय आणि हातांना सर्वाधिक संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसात भिजण्याचा प्रयत्न करा. ओले झाल्यास थोडे कोमट पाणी घालून त्यात लिंबाचा रस घाला. त्यानंतर त्या पाण्यात पाय टाका. त्याच कोमट पाण्याने हात आणि हात धुवा.

10 रोज किमान ८ ग्लास पाणी प्या आणि सनस्क्रीन लावायला विसरू नका. पावसाळ्यात जरी सूर्य नसेल तरी सूर्यांच्या धोकादायक किरणांचा त्वचेवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे सनस्क्रीन लावायला विसरू नका.

# चेहरा उजळण्यासाठी लिंबाचा वापर करताय?

**प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आपण आहारामध्ये लिंबूचा वापर करतो. काहीवेळी त्वचेची काळजी घेण्यासाठी लिंबूचा वापर केला जातो. लिंबूमध्ये असणारे व्हिटामिन सी हे त्वचेसाठी खूप फायदेशीर असते. पण लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिडदेखील असते. ज्यामुळे त्वचेला नुकसान होऊ शकते. त्यामुळे डर्मेटॉलॉजिस्ट लिंबाचा वापर त्वचेवर करण्यापूर्वी सतर्कतेचा इशारा देतात. लिंबाच्या रसापासून ते अगदी लिंबाच्या सालांपर्यंत त्वचेसाठी उपयोगात आणण्यात येते. पण तुम्ही केवळ लिंबाचा रस वापरणार असाल तर ५ थेंबापेक्षा अधिक वापर करू नका. लिंबाचा रस किंवा साल त्वचेसाठी फायदेशीर असते. पण त्याचा वापर कसा करावा यावर मात्र लक्ष देणं गरजेचं असते.**




- फेसपॅकमध्ये लिंबाच्या रसाचा वापर : चेहरा साफ करण्यासाठी आपण फेसपॅकचा वापर करतो. पण या फेसपॅकसाठी आपण लिंबूचा वापर करू शकतो. बाजारात मिळणाऱ्या फेसपॅकमध्ये अनेक केमिकल्स असतात. त्यासाठी तुम्ही घरच्या घरी फेसपॅक तयार करू शकता. यासाठी १ लहान चमचा तांदळाचे पीठामध्ये ५ थेंब लिंबाचा रस ,अर्धा चमचा गुलाबपाणी घ्या. हा फेसपॅक तयार करण्यासाठी एका बाऊलमध्ये तांदळाचे पीठ घ्या, त्यात लिंबाचा रस आणि गुलाबपाणी मिक्स करून घ्या. आता हे मिश्रण तुम्ही चेहऱ्यावर लावा आणि १५-२० मिनिटांनी चेहरा धुवा . आठवड्यातून एक वेळा तुम्ही या फेसपॅकचा उपयोग करून घ्या. या पॅकमुळे त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होईल.
- फेस स्क्रबमध्ये लिंबाचा रस : चेहरा साफ करण्यासाठी आपण स्क्रबचा वापर करतो. यामध्येदेखील आपण लिंबूचा वापर करू शकतो. यासाठी १ लहान चमचा साखर, १ लहान चमचा कोरफड जेल, ५ थेंब लिंबाचा रस घ्या. हा फेस स्क्रब बनवण्यासाठी एका बाऊलमध्ये साखर, कोरफड जेल आणि लिंबाचा रस मिक्स करा. आता या मिश्रणाने आपला चेहरा स्क्रब करा. २ मिनिटे चेहरा स्क्रब केल्यानंतर चेहरा धुऊन घ्या. या स्क्रबमुळे त्वचेचा काळपटपणा कमी होण्यास मदत होईल.
- फेस सिरममध्ये लिंबाचा रस : चेहऱ्याच्या त्वचेचा पोत सुधारण्यासाठी फेस सिरमचा वापर केला जाते. यातसुद्धा तुम्ही लिंबाचा वापर करू शकता. यासाठी १ कप ग्रीन टीचे पाणी, १ विटामिन ईची कॅप्सुल, ५ थेंब लिंबाचा रस घ्या. यासाठी सर्वात पहिले तुम्ही चहाची पाने पाण्यात उकळून घ्या. त्यानंतर यामध्ये विटामिन ई कॅप्सुल टाका. आता हे मिश्रण चेहऱ्यावर स्प्रे करा.
- लिंबाचा थेट वापर करू नका : चेहऱ्यावर लिंबाचा थेट वापर करू नका. क्रिम किंवा सिरममध्ये मिक्स करून लिंबाचा वापर करा. असे न केल्यास सनबर्नचा धोका वाढू शकतो. थेट सूर्यप्रकाशात बाहेर जाण्यापूर्वी लिंबू कधीही लावू नका.

# पावसाळ्यात सांभाळा फ्रिझी हेअर

**पावसाळ्यात ओल्या कपड्यांसोबत फ्रिझी हेअरसुद्धा खूप मोठी समस्या निर्माण होते. पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे घाम आणि चिकटपणाचा त्रास होतो, तर दुसरीकडे केस रेशमी दिसण्याऐवजी फुगलेले आणि कुरळेपणामुळे विखुरलेले दिसतात. पण या काळात काही छोटे उपाय करून तुम्ही खूप चांगले केस मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणते आहेत ते उपाय...**

- असा निवडा शॅम्पू : केसांमध्ये कमी प्रमाणात शॅम्पू लावा. आठवड्यातून दोन वेळा केस धुवा. त्यामुळे केसांचा पोत सुधारण्यास मदत होईल. पण या काळात केस चांगल्या पद्धतीने वाळवा, ते ओले ठेवू नका.
- उशीचे कवर घेताना हा विचार करा : केसांचा फ्रिझीपणा कमी करण्यासाठी उशीचे कवर घेताना नक्की विचार करा. सिल्कच्या कपड्याचा वापर करा. त्यामुळे केसांचे नुकसान होत नाही. त्यामुळे केसांना त्रास होणार नाही.
- कंडीशनिंग : पावसाळ्यात केसांची जास्त काळजी घेणं गरजेच असते. त्यामुळे केसांना योग्य पद्धतीने कंडीशनिंग करा. त्यासाठी कोकोनट ऑईल वापर तुम्ही करू शकता.
- हेअर मास्क : या दिवसात तुम्ही केसांना हेअर मास्कदेखील लावू शकता. यासाठी मुलतानी माती आणि गुलाबपाणीचा वापर घरी हेअर पॅक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो. या पॅकमुळे टाळूतील तेल साफ करताना कोंडाही कमी होईल. यामुळे केस स्वच्छ दिसतील आणि स्वच्छ वाटतील. यासोबतच केसांवर हेअर प्रोडक्ट्सचा वापर कमी करा.
- असं सुकवा केस : ओले केस खूप नाजूक असतात. त्यामुळे केस सुकवताना मोठ्या कंगव्याचा वापर करा. त्यामुळे केसांचे गळणे कमी होईल. या दिवसात केस ओले ठेवू नका.





## अतिरिक्त चमक हवी ?

आजकाल चेहऱ्याची चमक वाढवण्यासाठी अनेक प्रकारच्या थेरपी उपलब्ध आहेत ज्यांची तुम्ही मदत घेऊ शकता. त्वचा तरुण आणि चमकदार बनवण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

# प्रयत्न चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्याचा...

**अकाली वृद्धत्व निर्माण होणं ही खूपच सामान्य झाली आहे. या गोष्टीचा परिणाम तुमच्या त्वचेवर दिसून येतो. अनेक महिला फेशियल, महागड्या क्रीम्स किंवा महागड्या ब्युटी ट्रीटमेंट्सने स्वतःला सुंदर ठेवतात. गोष्टींमुळे तुमची त्वचा निरोगी होऊ शकते, परंतु जास्त काळासाठी त्याचा परिणाम राहात नाही. सुंदर दिसणे आणि ते सौंदर्य सांभाळणे या गोष्टीत खूप फरक आहे. मेकअपच्या मदतीने आपण काही काळ सुंदर दिसू शकतो, परंतु नैसर्गिकरित्या सुंदर ठेवण्यासाठी अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. तज्ञांनी याबद्दल काही टिप्स शेअर केल्या आहेत. चला तर मग जाणून घेऊयात कोणच्या आहेत त्या गोष्टी...**

- सनस्क्रीन विसरू नका : वयानुसार चेहऱ्यावर वृद्धत्व दिसणे सामान्य गोष्टी आहे, परंतु अकाली दिसणारी चिन्हे कमी होऊ शकतात. यासाठी नेहमी चेहऱ्यावर एसपीएफ सनस्क्रीन लावण्याचा प्रयत्न करा. तुम्ही बाहेर असाल किंवा आत, ते नेहमी चेहऱ्यावर आणि इतर ठिकाणी लावणे फार महत्वाचे आहे. या गोष्टीमुळे चेहऱ्यावर सुरकुत्या, पिगमेंटेशन, सन टॅन अशा समस्या उद्भवण्याची समस्या कमी होते.
- ब्युटी रूटीनमध्ये व्हिटॅमिन सी समाविष्ट करा : अँटिऑक्सिडंट घटक त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यास मदत करतात. सुरकुत्या व्यतिरिक्त, ते सूज किंवा दुरुस्त करण्यास देखील मदत करतात. सकाळी व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असलेले उत्पादनांचा वापर करा यामुळे तुमची त्वचा चांगली राहण्यास मदत होईल.
- त्वचेतून ओलावा नाहीसा होऊ नये प्रयत्न करा : त्वचेला मॉइश्चरायझिंग ठेवा. ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. या गोष्टीमधून त्वचेवर होणारे नुकसान टाळता येते. त्यामुळे जास्ती जास्त पाणी प्या.
- hyaluronic ॲसिड वापर : जसजसे आपण वय वाढतो, तसतसे त्वचेला अतिरिक्त बूस्टची आवश्यकता असते आणि यामुळे कोलेजन देखील वाढते. यासाठी hyaluronic acid वापरणे फायदेशीर ठरू शकते. हे त्वचा लवचिक ठेवते आणि सुरकुत्या यांसारख्या अकाली वृद्धत्वाच्या लक्षणांपासून रक्षण करते.

# पावसाळ्यात चेहऱ्याला बदामाच्या तेलाचे पोषण

**बदामाचे तेल आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी फायद्याचे असते. आयुर्वेदात बदामाच्या तेलाला फार महत्त्व देण्यात आले आहे. बदामाच्या तेलामध्ये असलेल्या पोषण द्रव्यांमुळे त्वचेवर वेगळी चमक येते. त्वचेचा पोत चांगला करण्यासाठी बदामाच्या तेलाचा वापर केला जातो. बदामाच्या तेलामध्ये व्हिटामीन ए, ई, डी , पोटॉशिअम, आयर्न, मँगनेशिअम, ओमेगा ३ फॅट्स असे पोषण द्रव्य असतात. यामुळे त्वचेचे आजार किंवा समस्या दूर करण्यास मदत होते. या तेलाच्या मदतीने आपण चेहऱ्यावर येणारे काळा डाग कमी करु शकतो. चला तर मग बदामच्या तेलाचे चेहऱ्याला होणारे फायदे जाणून घेऊयात...**

- या समस्या होतील दूर : जर तुम्ही चेहऱ्याला बदामाचे तेल लावणार असाल तर यामुळे डार्क सर्कल, सूर्याच्या किरणांमुळे होणारा त्रास. रिंकल्स, कोरडी त्वचा सुधारण्यास मदत होईल. त्याच प्रमाणे तुमच्या त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होईल.
- बदामाच्या तेलाचा कशा प्रकारे वापर करावा : बदामाच्या तेलाचा वापर आपण अनेक प्रकारे करू शकतो. एसेंशियल तेलामध्ये किंवा मॉइस्चराइजर म्हणून वापरू शकता. रात्री झोपण्यापूर्वी बदामाच्या तेलाने मालिश केल्याने त्वचेला त्याचा फायदा होतो.
- त्वचेवर तेज आणण्यासाठी : तुमच्या त्वचेवर जर तुम्हाला नैसर्गिक तेज हवे असेल तर तुम्ही बदामाच्या तेलाचा वापर करणे गरजेचे आहे. बदामाचे तेल चेहऱ्याला लावल्यानंतर तुमच्या त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते.
- सुरकुत्या कमी करण्यासाठी : चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी करण्यासाठी आपण बदामाच्या तेलाचा वापर करू शकतो. सुरकुत्या कमी करण्यासाठी बदामाचे तेल हा रामबाण उपाय आहे. एका वाटीमध्ये बदाम तेल, नारळ तेल आणि कोरफड जेल एकत्र घ्या आणि या मिश्रणाने चेहऱ्याचा मसाज करा. या उपायामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो आणि सुरकुत्या देखील कमी होतील.

## मुरुमांच्या समस्येपासून मुक्तता

बदामाच्या तेलामुळे मुरुमांच्या समस्येपासून मुक्तता मिळावता येते. जर तुम्हाला मुरुमांच्या समस्येपासून मुक्ताता मिळवायची असेल तर तुम्ही आठवड्यातून दोन वेळा बदामाच्या तेलाने चेहऱ्याची मालिश करु शकता.



# केस स्वस्तात करा स्ट्रेट, मऊशार व चमकदार?

**केसांना स्ट्रेट राखणे सर्वच तरुणींना खूप आवडते. एखाद्या लग्नासाठी वा पार्टीसाठी सतत स्ट्रेटनिंगसाठी पैसे खर्च करण्यापेक्षा पर्मनंट स्ट्रेटनिंग करणे एक चांगला ऑप्शन आहे. पण केस स्ट्रेटनिंग करणे ही एक खर्चिक प्रक्रिया आहे हे देखील तेवढेच खरे. शिवाय या प्रक्रियेबद्दल अनेक मतमतांतरे देखील आहेत. या प्रक्रियेचे काही तोटे सुद्धा आहेत. यामुळे केस स्ट्रेट तर होतात पण डॅमेजदेखील होतात. पण तुम्हाला माहित हे का केसांना स्ट्रेट करण्यासाठी स्टायलिंग टूल्स, केमिकलयुक्त प्रोडक्ट वापरायलाच हवे असे काही नाही. तुम्ही घरगुती उपाय वापरून सुद्धा तुमच्या केसांचे स्ट्रेटनिंग करू शकता. याची सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे यामुळे केस कायमचे स्ट्रेट व चमकदार होतात. असे अनेक घरगुती हेअर मास्क आहेत ज्यांच्या वापराने केस कायमचे स्ट्रेट होऊ शकतात आणि त्याबद्दलच आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत...**

- एरंडेल आणि नारळ तेलाचा मास्क : एरंडेल आणि गरम केलेल्या नारळ तेलाचा हेअर मास्क हा हेअर स्ट्रेटनिंगसाठी एक उपयुक्त उपाय आहे. हा हेअर मास्क तरी करण्यासाठी एरंडेल आणि नारळ तेल मिक्स करा. हे १० सेकंदासाठी गरम करा. आता हे मिश्रण आपल्या केसांना लावून स्कॅल्प आणि रुट्सची मालिश करा. आपल्या डोक्याला 30 मिनिटे गरम टॉवेलने झाकून ठेवा. आता आपल्या केसांना शॅम्पू लावून थंड पाण्याने धुवून घ्या. हा हेअर मस्क खूप जास्त प्रभावी असल्याचे जाणकार देखील सांगतात.
- नारळ पाणी आणि लिंबाच्या पाण्याचा रस : नारळ पाणी आणि लिंबू पाण्याचा रस यांचे मिश्रण तयार करण्यासाठी दोन्ही रस हे रात्रीच मिक्स करून ठेवून द्या. सकाळी उठल्यावर हे मिश्रण केसांच्या मुळांपासून संपूर्ण केसांवर लावा. ३० मिनिटे केस असेच राहू द्या आणि थंड पाण्याच्या सहाय्याने माईल्ड शॅम्पूने केस धुवून घ्या. चांगल्या रिझल्टसाठी आठवड्यातून एकदा तरी हा हेअर मास्क तुम्ही वापरणे खूप गरजेचे आहे. तेव्हाच तुम्हाला फरक दिसून येईल.
- अंडी आणि ऑलिव्ह ऑईलचा मास्क : अंडी आणि ऑलिव्ह ऑईलपासून तयार केलेला हेअर मास्क हा अत्यंत नेच्युरल हेअर मास्क मानला जातो. हा हेअर मास्क बनवण्यासाठी सर्व साहित्य योग्य पद्धतीने मिक्स करणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे जेव्हा तुम्ही ही कृती



करताल तेव्हा सर्व सामग्री नीट एकजीव करून घ्या. आता हा मास्क आपल्या केसांवर अप्लाय करून किमान ३० मिनिटे तरी असाच राहू द्या. केसांवरून हा हेअर मास्क काढण्यासाठी विशेषतः क्लीजिंग जेल बेस्ड शॅम्पूचा वापर करा. यामुळे केस लगेच स्वच्छ होतील.
- ऐलोवेरा हेअर मास्क : केसांना स्ट्रेट करण्यासाठी गरम केलेले नारळ तेल वा ऑलिव्ह ऑईल ऐलोवेरा जेलमध्ये मिक्स करावे. हे मिश्रण आपल्या केसांवर योग्य पद्धतीने अप्लाय करा आणि जवळपास ४० मिनिटे असेच लावून राहू द्या. यानंतर केसांना थंड पाण्याने धुवून घ्या. यानंतर सल्फेट फ्री शेम्पूने आपल्या केसांना पुन्हा धुवून घ्या. तुम्ही जर हे मिश्रण आठवड्यातून एकदा तरी लावले तरी तुम्हाला काहीच दिवसांत फरक दिसून येईल आणि जो इफेक्ट कृत्रिम पद्धती वापरून येतो तसाच इफेक्ट तुम्हाला घरबसल्या केसांवर दिसेल.
- केळी आणि पपई : केळी आणि पपई यांचा हेअर मास्क बनवण्यासाठी दोन्ही पदार्थ योग्य मात्रेमध्ये एकमेकांमध्ये मिक्स करून घ्या. तोवर हे मिश्रण एकजीव करा जोवर तुम्हाला एकदम पातळ पेस्ट मिळत नाही, मास्क आपल्या केसांवर लावण्यासाठी हातांचाच वापर केलेला उत्तम होय. केसांवर हे मिश्रण लावल्याने ४५ मिनटे केस असेच सोडून द्या. आता केसांना माईल्ड शॅम्पू आणि थंड पाण्याने धुवून घ्या. हा उपाय सुद्धा केसांसाठी अत्यंत रामबाण समजला जातो. यामुळे केसांना फायदा होतोच शिवाय केस सुद्धा स्ट्रेट होतात.

# आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठीही महाराष्ट्र महत्वाचे केंद्र -मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र आता केवळ भारतातीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठीही महत्त्वाचे केंद्र बनत आहे, आणि भविष्यातील उद्योग आणि नाविन्यतेसाठी राज्य तयार होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज पॅलेस येथे बँक ऑफ अमेरिकातर्फे आयोजित ’ २०२५ इंडिया कॉन्फरन्समध्ये : एक्सेलेटरिंग ग्रोथ, महाराष्ट्रा वन ट्रिलीयन’ या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मेक इन इंडिया या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणाचा सर्वाधिक लाभ महाराष्ट्राला झाला आहे. तसेच नुकतेच यशस्वी झालेले ऑपरेशन सिंदूर ने भारतीय संरक्षण उत्पादनक्षमता किती प्रगत झाली आहे, हे दाखवून दिले आहे. उत्तर प्रदेश व तमिळनाडूमध्ये संरक्षण उद्योगाचे क्लस्टर्स असले तरी खऱ्या अर्थाने भारतातील संरक्षण उत्पादनाचे केंद्र महाराष्ट्रच आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात मोठी घोडदौड केली असून, राज्य आज मोठ्या प्रमाणावर संरक्षण उत्पादनाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

देशातील सुमारे ६० % डेटा सेंटर क्षमता आता महाराष्ट्रात आहे. मुंबई ही आधीच देशाची प्रमुख फिनटेक राजधानी झाली आहे, तसेच महाराष्ट्र हे स्टार्टअपसाठी देखील एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संधींबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जगभरातील गुंतवणूकदार आता सुरक्षित पर्याय शोधत आहेत, जे जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतील, आणि भारत या संधीसाठी सर्वात योग्य स्थानावर आहे. महाराष्ट्र शासन या संधीसाठी पूर्णतः सज्ज आहे.

दावोस आर्थिक परिषदेदरम्यान महाराष्ट्राने १६ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. यापैकी निम्म्याहून अधिक गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात आहे, हे लक्षवेधी असून ‘मेक इन इंडिया’चा प्रत्यक्ष परिणाम राज्यात दिसून येत आहे. उत्पादन व औद्योगिक विकास हेच राज्याच्या प्रगतीचे केंद्रबिंदू असून, मेक इन इंडिया योजनेमुळे महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. राज्याच्या गतीमान विकासाला प्राधान्य देत विविध क्षेत्रात महाराष्ट्र यशस्वी घोडदौड करत आहे. मुंबईच्या सागरकिनारी मर्यादित विस्तारक्षेत्र लक्षात घेता ‘चौथी मुंबई’ ही संकल्पना महत्वाची ठरणार आहे. अटल सेतू या २२ किमी लांबीच्या सागरी पुलामुळे मुंबई आणि नवी मुंबई यांच्यात जलद संपर्क साधला गेला असून, यामुळे या भागातील अंतर्गत परिसर मुंबईचा विस्तार मानला जात आहे. या भागात सध्या नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात असून ते ऑगस्टमध्ये सुरू होईल. या संपूर्ण पट्ट्यात एक तीनपट मोठे नवे शहर विकसित करण्याचा विचार आहे, जिथे विविध सकंल्पना (थीम) असलेली शहरे उभारली जातील. यामध्ये ‘एज्यू-सिटी’ (विद्यापीठ नगरी) ज्यात दहा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांचा समावेश असेल, जिथे मोठ्या संख्येने विद्यार्थी उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण घेतील. तसेच ‘स्पोर्ट्स सिटी’, ‘मेडिसिन सिटी’, ‘नॉलेज सिटी’, आणि ‘इनोव्हेशन सिटी’ अशा संकल्पनांचा समावेश असेल.

# प्रवाशाच्या बॅगेत सापडले ४७ विषारी साप आणि ५ कासव



**मुंबई (प्रतिनिधी)** – विमानतळावर तपासणीदरम्यान प्रवाशांकडून सोनं आणि इतर महागड्या वस्तू जप्त केल्या जातात हे आपण अनेकदा ऐकतो आणि पाहतो. परंतु मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक विचित्र दृश्य पहायला मिळालं. विमानतळावर सीमाशुल्क तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी एका भारतीय प्रवाशाकडून चक्क ४७ विषारी साप आणि पाच कासवं जप्त केली आहेत. प्रवाशाकडे इतक्या मोठ्या संख्येने साप पाहून सुरक्षा कर्मचारीही हादरले. हा प्रवासी थायलंडहून भारतात परतला होता. त्याने बँकॉकहून भारतात येण्यासाठी विमानाने प्रवास केला होता. याप्रकरणी त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका भारतीय प्रवाशाकडे ४७ विषारी साप आणि पाच कासवं आढळून आली. अधिकाऱ्यांना संबंधित प्रवाशाबद्दल संशय आला होता. त्यानंतर त्यांनी त्याला थांबवलं आणि त्याच्या बॅगेची तपासणी केली. या तपासणीदरम्यान त्यांना विषारी साप आणि कासवं आढळून आली. ठथ (रेस्किंक असोसिएशन फॉर वाइल्ड लाइफ वेलफेअर) पथकाने या साप आणि कासवांच्या प्रजाती ओळखण्यास मदत केल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं. हे साप आणि कासव वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत पुन्हा त्या देशात परत पाठवले जातील. याप्रकरणी प्रवाशाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्यावर योग्य ती कारवाई केली जात आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशाच्या चेक-इन बॅगमध्ये सापडलेल्या साप आणि कासवांमध्ये तीन स्पायडर टेल्ड हॉर्नड वायपर, पाच एशियन लीफ टर्टल आणि ४४ इंडोनेशियन पिट वायपर यांचा समावेश होता.

## टी.सी.हरवली

माझी नौशाद अहमद निसार अहमद या नांवाची १२ वी विज्ञान पासची टि.सी.नांदेड येथे भोकर बस प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावे,हि विनंती.

**-संपर्क पत्ता-**
**नौशाद अहमद निसार अहमद**
**रा.नाईकनगर नांदेड**

**श्री बसवेश्वर विद्यालय मुलांचे व मुलींचे वसतिगृह फुलवळ ता.कंधार जि.नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे.

सन २०२५-२०२६ साठी स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण चालू आहे.तरी खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ८० टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १० टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | ५ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग | २ टक्के |
| ५ | अंध व अपंग | ३ टक्के |
| ६ | एकूण | १०० टक्के |

नोट टक्केवारीशिवाय मान्य संख्येच्या २० टक्के जास्तीच्या खालील जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.१.इतर मागासवर्गीय-१५ टक्के २. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय ओपन ५ टक्के,एकूण २० टक्के वरील टक्केवारीच्या अधीन राहून प्रवेश दिला जाईल.सर्व विद्यार्थ्यांना आधारकार्ड बंधनकारक आहे.

**श्री बापुराव निळकंठराव मंगनाळे**
सचिव बसवेश्वर शिक्षण समिती फुलवळ मो.९१७५९१८२२८

## टी.सी.हरवली

माझी रोहणी राजाराम लोकडे या नांवाची १२ वी पासची टि. सी. मार्क मेमो व सनद राजनगर ते शिवाजीनगर ऑटो प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावे,हि विनंती.

**-संपर्क पत्ता-**
**रोहिणी राजाराम लोकडे**
**३ रा मजला फॅमीली कोर्टाच्यावर वजीराबाद नांदेड**
**मो.८६६९३०६९८६**

## टी.सी.हरवली

माझी माधव बापुराव वायवळे या नावाची स्वामी रामानंद तीर्थ संकुल नांदेड एम.एस. डब्लू. २००४ उत्तीर्णची टि. सी.राजकॉर्नर ते सुगाव रस्त्यावर प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावे,हि विनंती.

**-संपर्क पत्ता-**
**मो.७७९८८९९९३**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

# उपसंचालक डॉ. सुरेखा मुळे सेवानिवृत्त; अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून निरोप



**लातूर (प्रतिनिधी)** – माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागीय माहिती कार्यालयातील उपसंचालक (माहिती) डॉ. सुरेखा मुळे या ३१ मे रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. विभागीय माहिती कार्यालय आणि लातूर, धाराशिव, नांदेड व हिंगोली जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत त्यांचा निरोप व सत्कार समारंभ पार पाडला.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जनसंपर्क अधिकारी अनिरूद्ध अष्टपुत्रे, महासंचालनालयाचे सेवानिवृत्त संचालक गणेश रामदासी, सेवानिवृत्त संशोधन अधिकारी मयुरा देशपांडे-पाटोदकर, लातूरचे ज्येष्ठ पत्रकार अरूण समुद्रे, जयप्रकाश दगडे, लातूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य नरसिंह घोणे, डॉ. मुळे यांच्या आई पुष्पा, मुळे परिवारातील सदस्य आदी उपस्थित होते.

कर्तव्य कालावधीत जुन्या, नवीन सहकाऱ्यांकडून बरेच शिकता आले. महासंचालनालयामध्ये काम करताना मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, विभागीय संपर्क अधिकारी अशी पदे जबाबदारीने सांभाळली. महासंचालनालयातील माझ्या कर्तव्य कालावधीत सर्व चांगली माणसे मला मिळाली, हे माझे भाग्य असल्याचे डॉ. मुळे म्हणाल्या. डॉ. मुळे यांच्या सेवा कालावधीतील कार्याचा गौरव अष्टपुत्रे यांनी केला.लातूर विभागीय माहिती कार्यालय आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयातर्फे डॉ. मुळे यांना भेटवस्तू, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## Change In Name

My Old Name is - MANOJKUMAR SHAMSUNDARRAO BHALERAO which now I am changing as New Name -MANOJKUMAR SHAMSUNDAR BHALERAO - Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.ADD:MANOJKUMAR SHAMSUNDAR BHALERAO SAIBABA NIVAS NEAR SAIBABA MANDIR SHRINATH NAGAR CHATANYANAGAR NANDED Tq & Dist NANDED 431605

## Change In Name

My Old Name is SAYED NAZIR NAWAB which now I am changing as New Name SAYED NAZEER SAYED NAWAB- Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.ADD:H.N.1-12-1-11 GALLI NO 18 PEERBURHAN NAGAR POST BHAVASARCHOWKTARODABKDISTNANDED MAHARASHTRA 431605 MO.9594141498




Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India
Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com
६७१/२५-२६

# गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड

## जाहीर निविदा

सर्व वेल्डर फॅब्रिकेशन व्यापा-यारी बंधुना सुचित करण्यात येते की, गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहिब नांदेड डिर्पाटमेंन्टली कार्यासाठी वेळोवेळी आवश्कते प्रमाणे साहित्य तयार करुन घ्यावयाचे आहे. तरीही लोडींग अनलोडींग सुचित साईटवर वाहतुक वजन (धर्म काटयावर वजन करून) सर्व कर ट्रॉन्सपोर्टेशन सहित (प्रतिकिलो/प्रतिनग) प्रमाणे दर कोटेड करून लिफाफयात अधिक्षक गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड या नावाने दिनांक ११-०६-२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत सायं ४.०० वाजेपर्यंत पोहचतील या बेताने किवा समक्ष आणुन दयावे.

अ) सामग्री सहित ( with Material)

(मटेरियल + लेबर चार्जेस + साईड डिलेव्हरी + फिक्सींग आदि एकत्रित दर नमुद करावे )

१. ग्रिल, सर्व प्रकारचे गेट, दरवाजे, खिडकी, सिडी, चेंबर कव्हर, स्टुल, टेबल आदि तत्सम आवश्यक साहित्य सुचविलेल्या डिजाईन अनुसार - दर प्रतिकिलो प्रमाणे.

२.रोलींग शटर-१८ गेज (प्रतिनग ) दर प्रतिकिलो प्रमाणे.

शटर बेरिंग---(प्रतिनिग)

टॉप कव्हर-----(प्रतिकिलो / प्रतिनग )

रोलींग शटर फिटींग चार्जेस (प्रतिनग प्रमाणे)

३.चौरस पाईप टिनशेड फ्रेम सहित (पाईप ३ इंची २ इंची)- दर प्रतिकिलो प्रमाणे.

४. प्लेन शिट दर प्रतिकिलो प्रमाणे

५.चैनल गेट प्रतिकिलो प्रमाणे

ब) मजुरी ( Labour Charges )

(मटेरियल कार्यालयाच्या वतिने पुरविण्यांत येईल फिक्सींग आदि गृहित धरुन केवळ मंजुरी दर नमुद करावे )

१.सर्व फॅब्रीकेशन कार्य वरिल नमुद सर्व साहित्याचे तयार करावयाचे मंजुरी दर प्रतिकिलो / प्रति चौरस फुट प्रमाणे नमुद करावे.

२.Profile Sheet Fixing Removing Labour Charges

( टिनशेड शीट लावणे/काढने दर प्रति चौ.फुट प्रमाणे नमुद करावे)

टिप-१.निर्माण करण्यांत येणा-या साहित्याचे डिजाईन, साईज, गेज, सेक्शन आदि कार्यालयाच्या वतिने सुचित करण्यांत येईल.

२.आवश्यक साहित्यास ग्राईन्डींग, फिनशिंग व रेड ऑक्साईड कलर एक कोट करने.

३.गेट करिता लागणारे बेअरिंग चे वेगळे पेमेंन्ट करण्यांत येणार नाही. दरात ग्राहय धरण्यात येईल.

४.मटेरियल आणि लेबर चे रेट सेपरेट लिहून देणे.

५.अधिक माहीती साठी इंजीनिअरींग विभागाशी संपर्क साधवा.

६.कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार अधिक्षक तख्त सचखंड गुरुद्वारा अबचलनगर साहीब नांदेड कडे राखीव आहेत.

**अधिक्षक**
**गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड.**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## 'स्वारातीम' विद्यापीठाकडून १३ दिवसांत पदवी परीक्षांचे निकाल जाहीर

### एवढ्या कमी दिवसांत निकाल लावणारे राज्यातील एकमेव विद्यापीठ

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.२ ते ३० एप्रिल दरम्यान घेण्यात आल्या होत्या. या घेण्यात आलेल्या परीक्षांचे निकाल १३ दिवसांच्या आत जाहीर करण्यात आले. एवढ्या कमी कालावधीत निकाल जाहीर करणारे हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांच्यावर शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे यावर्षी पेपरच्या मूल्यांकनासाठी प्रथमच अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यामध्ये जवळपास ८ लाख ५० हजार उत्तरपत्रिकांचे स्क्रीनिंग करून त्या उत्तरपत्रिका चार जिल्ह्यातील ७६ मुल्यांकन केंद्रावर ऑनलाईन पाठविण्यात आल्या होत्या. यामुळे प्राध्यापकांना तात्काळ मूल्यांकन करता आले. ऑनलाइनमुळे एका दिवसात जास्तीत जास्त उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करता आले. या सर्व तंत्रज्ञानामुळे विद्यापीठाला ७१ पदवी अभ्यासक्रमाचा निकाल १३ दिवसात जाहीर करण्यात आला. विद्यापीठाच्या इतिहासामध्ये प्रथमच एवढ्या कमी कालावधीमध्ये निकाल जाहीर करण्यात आला आहे. पदवी व पदव्युत्तरच्या एकूण १८३ अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यापीठातर्फे घेण्यात आली होती. त्यापैकी पदवीचे सर्व निकाल जाहीर झाले आहेत, तर पदव्युत्तरचे थोड्याफार अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर करण्याचे शिल्लक आहे.

पदवी व पदव्युत्तरचे सर्व निकाल लवकर जाहीर करण्याकरिता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वाणिज्य व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. डी. एम. खंदारे, मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी कळविले आहे.

## किनवट रेल्वेस्टेशनवर नवीन १२ मीटर रुंद फूट ओव्हर ब्रिजसाठी गर्डर्सचे यशस्वी लाँचिंग



**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट रेल्वे स्टेशनवर १२ मीटर रुंद फूट ओव्हर ब्रिज (पादचारी पूल) बांधण्यासाठी प्रत्येकी २९.८० मीटर लांबीचे ११ गर्डर्स यशस्वी रित्या बसविण्यात (लाँचिंग) आले. ट्रेन ऑपरेशन्स आणि प्रवासी सेवांमध्ये कमीत कमी व्यत्यय आणून हा मोठा अभियांत्रिकी टप्पा ३ तासांच्या कडक वाहतूक आणि ओव्हरहेड इक्विपमेंट पॉवर ब्लॉकमध्ये साध्य करण्यात आला.

नवीन लाँच केलेले गर्डर्स प्रवाशांच्या सोयी आणि सुरक्षिततेत लक्षणीय सुधारणा करण्यासाठी डिझाइन केलेल्या आधुनिक आणि रुंद फूट ओव्हर ब्रिजच्या जलद बांधकामाला पाठिंबा देतील. पादचारी पूल (ऋज्इ) मध्ये प्लॅटफॉर्म १ आणि २ वर लिफ्टचा समावेश असेल, ज्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग प्रवाशांसाठी स्टेशन अधिक सुलभ होणार आहे. याव्यतिरिक्त, फूट ओव्हर ब्रिज मध्ये किओस्क सुविधा असतील, ज्यामुळे दोन प्लॅटफॉर्म दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा स्थानकावरील अनुभव आणखी सुलभ होईल.

हे यश कार्यक्षम, सुलभ आणि प्रवासी-अनुकूल रेल्वे सेवांना समर्थन देणाऱ्या पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी अभियांत्रिकी टीम आणि रेल्वे प्रशासनाची वचनबद्धता प्रतिबिंबित करते.

## लाचप्रकरणी दोन्ही महिला तलाठ्यांना पोलीस कोठडी



**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील शेत सर्व्हे नंबर १६ मधील २ हेक्टर ७९ आर हे वडीलोपार्जित शेतीमधील १ हेक्टर ३९ आर शेती पत्नीच्या नावावर करण्यासाठी १६ हजार रुपयांची लाच स्विकारणाऱ्या दोन्ही महिला तलाठ्यांना नांदेड येथील दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

दि. २९ मे रोजी लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयात आलेल्या तक्रारीनुसार, तक्रारदाराकडे असलेल्या जमिनीतील काही हिस्सा पत्नीच्या नावाने करण्यासाठी पांगरा सज्जा सिंदगी येथील तलाठी भाग्यश्री भिमराव तेलंगे यांनी लाच मागितली होती. या संदर्भाने लाच मागणीची पडताळणी झाली आणि ३ जून रोजी तलाठ्यांच्या खासगी कार्यालयात किनवट येथे तेलंगे यांची भेट घेतली असता तेंव्हा माझी बदली झाली आहे. तुमचे काम गवळे मॅडमकडे आहे असे सांगून त्यांना भेटायची सुचना केली. दोन्ही महिला तलाठ्यांनी आपापसात चर्चा करून काय करायचे यावर चर्चा केली आणि काम करायचे नसेल तर फाईल देवून टाक असेही सांगितले. एकाच गोष्टीला दहावेळेस सांगायला आम्हाला वेळ नाही असा दम पण दिला. शेवटी १६ हजार रुपये घ्यायचे ठरले. ही सर्व पडताळणी व्हाईस रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने भाग्यश्री भिमराव तेलंगे (वय ३४) सज्जा निचपुर ता. किनवट रा. हनुमान मंदिरसमोर गोकुंदा, किनवट तसेच सुजाता शंकर गवळे (वय २५) तलाठी सज्जा कनकवाडी ता. किनवट रा. एकतानगर गोकुंदा यांना अटक केली. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात दोघिंविरुद्ध लाचेचा गुन्हा दाखल करण्यात आला.

तपास अधिकारी पोलीस उपअधिक्षक प्रशांत पवार आणि त्यांच्या सहकारी पोलीस अंमलदारांनी पकडलेल्या दोन्ही महिला तलाठ्यांना बुधवार दि. चार जून रोजी न्यायालयात हजर केले. जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. रणजित देशमुख यांनी तपासाच्या प्रगतीसाठी दोन्ही महिला तलाठ्यांना पोलीस कोठडी देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने या दोन्ही महिला तलाठ्यांना पाच जूनपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

## उमरी तालुक्याचा विभागीय आयुक्तांकडून गौरव

**नांदेड (प्रतिनिधी) –** 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' अर्थात 'ग्राम दरबार' अंतर्गत उमरी तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कामगिरीची दखल घेत विभागीय आयुक्तांकडून उमरी येथील गटविकास अधिकारी व्ही. आर. अरबडवाड यांचा गौरव करण्यात आला आहे.

जिल्ह्यात प्रत्येक बुधवारी एका गावात हा उपक्रम राबविला जात आहे. प्रारंभी मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये तर नंतर लहान ग्रामपंचायतींमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्यात येत आहे. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी तपासणी, आरोग्य शिबिरे, पशुसंवर्धन विभागाच्या सेवा, तसेच विविध योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी गट विकास अधिकारी आरबडवाड यांचे अभिनंदन केले आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही ग्राम दरबार उपक्रम प्रभावीपणे राबविला जात असून, शासनाच्या योजनांचा लाभ थेट ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवण्याचे हे एक प्रभावी माध्यम ठरत आहे.



**किनवट :** छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यांमध्ये 'सस्ती अदालत'उपक्रम राबवून किनवट तालुक्याने प्रथम क्रमांक पटकाविला. विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांचा सत्कार करण्यात आला. (छाया : साजीद बडगुजर)

## दादाराव शिंदे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दादाराव विठ्ठलराव पाटील शिंदे (वय ७०) यांचे दि.३ रोजी रात्री ११ वा. निधन झाले. त्यांच्यावर दि.४ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शेनीचे चेअरमन माधवराव पाटील शिंदे यांचे मोठे बंधू व पहेलवान संतोष दादाराव पाटील शिंदे यांचे ते वडील होत.

## घरफोडीतील अट्टल चोरटा मुद्देमालासह 'एलसीबी'च्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात घरफोड्या करून पोलिसांना चकमा देणाऱ्या अट्टल चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहराच्या लालवाडी भागात पाठलाग करून ब्रिजखाली अटक केली. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेवून त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिले होते.

पोलीस उप निरीक्षक नागनाथ तुकडे, साईनाथ पुयड, मारोती चव्हाण व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार विलास कदम, गणेश धुमाळ, संदीप घोगरे, बालाजी कदम, अमोल घेवारे, मेजबिन शेख, सायबरचे राजेंद्र सिटीकर आणि दीपक ओढणे असे जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अभिलेखावरील माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत असतांना राहुल बालाजी सोनकांबळे हा एक चोरीचा मोबाईल विक्री करण्यासाठी ३ जून रोजी लालवाडी ब्रीजच्या खाली थांबल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उप निरीक्षक नागनाथ तुकडे, साईनाथ पुयड व त्यांच्या टीमने सदर ठिकाणी जाऊन संशयीतरित्या उभा असलेला युवकाला ताब्यात घेतले. पोलीस दिसताच आरोपी राहुल सोनकांबळे पळाला. पोलिसांनी पाठलाग करून लालवाडी ब्रिजखाली त्याला पकडले. राहुल ऊर्फ बंटी बालाजी सोनकांबळे (वय २९ वर्षे रा. सिंधी ता.उमरी जि. नांदेड ह. मु. तेहरानगर लालवाड़ी नांदेड) असे घरफोडी करणाऱ्या चोरट्याचे नाव आहे. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक मोबाईल व नगदी रुपये मिळुन आले. नगदी रुपये व मोबाईल जप्त केला. अंदाजे एक ते दिड महीन्यापूर्वी पाथ्रड ता. मुदखेड येथील एका घरातुन रात्रीच्या वेळी चोरलेला आहे, असे आरोपीने कबूल केले.

त्यावरुन सदर मोबाईलचा IMEI नंबरची पोलीस अभिलेखावर पाहणी केली असता सदर मोबाईल हा पो. स्टे. बारड गुरनं. ४०/३ कलम ३३१(४),३०५ भारतीय न्याय संहिता मधील असल्याचे निष्पन्न झाले. नगदी रुपये व मोबाईल जप्त करुन त्यास बारड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com